**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 27/07/2026

**आरोपी लोकसेवक** :- श्री. चंद्रकांत कामठे, पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक आर्थिक गुन्हे शाखा पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचेकडुन 50,000/- रुपये लाचेची मागणी केल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे बेगमपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | श्री. चंद्रकांत कामठे, वय 38 वर्ष, व्यवसाय -नोकरी, पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक आर्थिक गुन्हे शाखा पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर, रा. सतारा परिसर, जि. छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 50,000/- |
| लाच स्विकृती रक्कम | --- |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री.शांतीलाल चव्हाण, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री.चैनसिंग गुसिंगे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी अर्जात फ़सवणुकी चा गुन्हा दाखल करण्यासाठी व सदर गुन्हयातिल आरोपी यांना अटक करुण गुन्हयात मदत करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी अर्जात फ़सवणुकीचा गुन्हा दाखल करण्यासाठी व सदर गुन्हयातील आरोपी यांना अटक करुण गुन्हयात मदत करण्यासाठी आलोसे यानी तक्रारदार यांच्याकडे 50,000/- रुपयाची मागणी दिनांक 27/02/2026 रोजी केली होती. परंतू तक्रारदार यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंध विभाग छत्रपती संभाजी नगर येथे समक्ष येऊन तक्रार नोंदवली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने अनुषंगाने दिनांक 11/03/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता यातील आलोसे श्री. चंद्रकांत कामठे, पोलीस उप निरीक्षक यांनी तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारी अर्जात फ़सवणुकीचा गुन्हा दाखल केला याचे बक्षीस व सदर गुन्हयातील आरोपी याना अटक करुन गुन्हयात मदत करण्यासाठी स्वतः साठी व पो.नी. श्री पवार यांचे साठी 50,000/- हजार रुपयांची लाच मागणी करून, तडजोडी अंती 50,000/- रुपये स्वीकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले .<br>तसेच तसेच सदर दिवशी पो नि पवार यांची भेट झाली नाहीं म्हणुन दिनांक 12/03/2026 तक्रारदार यांना पुन्हा पाठविण्यात आले परंतु पो नि पवार यांची भेट झाली नाही. त्या नंतर आलोसे यांना संशय आल्याने त्यानी तक्रारदार यांना भेटण्यास टाळाटाळ केली तसेच पोनि पवार यांची सदर ठिकाणावरुन बदली झाल्याने आता आलोसे मागणी केल्या प्रमाणे लाच रक्कम घेणार नाही असा तक्रारदार यांनी जबाब दिल्यामुळे आलोसे चंद्रकांत हनुमंत कामठे यांना ताब्यात घेऊन त्यांचे विरुध्द पो.स्टे.बेगमपुरा येथे भ्र.प्र.अधि.1988 चे कलम 7 अन्वेये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>आरोपी लोकसेवक यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्री.शांतीलाल चव्हाण यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह.रविंद्र काळे, पोह.विलास चव्हाण,ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9870145915 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

(प्रशांत पवार)
पोलीस उप अधीक्षक,
ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.